Tel :- 022 22620453
Fax :- 022 22671408
E mail ID - dcpzone1-mum@mahapolice.gov.in

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

**Dy.Commissioner of Police, Zone 1,**
Walchand Hirachand Marg, Fort, Mumbai-400001.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मुंबई.
वालचंद हिराचंद मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१

जा.क्र. ४९६ /पोउआ/परि१/वा/२०२२ दिनांक - १०/०२/२०२२

प्रति,

पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई

**विषय -** न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरुध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल....

**संदर्भ -** १) शासन निर्णय क्र. डीपीपी २०१५/प्र.क्र.५१/पोल१०,दि.२६/०२/२०१९
२) मु.नि.क. बि.सं. क्र. १६९/२२, दि. १५/०१/२०२२
३) जा.क्र. पोउआ(प्रकटीकरण)/वा/२१८/२०२२, दिनांक ०९/०२/२०२२

उपरोक्त विषयास अनुसरून अहवाल सादर करण्यात येतो की, दि. ०१/१०/२०२१ ते दिनांक ३१/१२/२०२१ या कालावधीमध्ये पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१ कार्यालयामध्ये न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरुध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीकरिता परिमंडळ -१ मधील सर्व पोलीस ठाण्यांचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पैरवी अधिकारी व विधी अधिकारी, परिमंडळ -१ इत्यादी सदस्य उपस्थित होते. समितीच्या बैठकींमध्ये परिमंडळ-१ मधील दोषमुक्त झालेल्या ०४ खटल्यांच्या न्यायनिर्णयांची तपासणी करण्यात आली.

सदरचा अहवाल माहितीकरिता सादर करण्यात येत आहे.

( डॉ. हरी बालाजी एन. ) भा.पो.से
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ-१, मुंबई

Dy. Commissioner of Police (Detection)
Crime Branch C I D Mumbai

आ. क्र. ५८१ पोउआ (प्रकटीकरण)/22
दिनांक ११/०२/२०22

Scanned with CamScanner

**आयुक्तालय / पोलीस अधिक्षक कार्यालय :-** पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -१, मुंबई

**समितीच्या बैठकीचा दिनांक :-** दिनांक - ०७/०२/२०२२

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरूद्ध केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोक्सो सेशन केस क्र. ५९२/२०१८<br>कोर्ट नं. ३४<br>मा. न्यायाधीश श्रीमती फुलाटे | **कुलाबा पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. १६९/२०१६.<br>कलम ३५४, ३५४(ब) भा. दं.वि सह ८, १२ पोक्सो. | ३०/१०/२०१८ | २१/१२/२०२१ | फिर्यादीने सरकारी पक्षास सहकार्य केले नाही. तसेच आरोपीविरुध्द सबळ पुरवा मिळून न आल्याने, आरोपी दोषमुक्त झाला आहे. | नाही | **निरंक** | - |
| २ | सेशन केस क्र. ४२३/२०१९<br>कोर्ट नं. ६१<br>मा. न्यायाधीश श्रीमती ए.एच. काशीकर | **कफ परेड पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. १८८/२०२०,<br>कलम ३५३, ३३२ भा.दं.वि. | ०४/०४/२०१९ | ०७/१२/२०२१ | १) सदर प्रकरणात फिर्यादी यांनी नोंद केलेला जबाब व जबाबामध्ये नोंद गोष्टी या सरकारी पक्षाने मा. न्यायालया समक्ष सादर करण्यात असमर्थ ठरले.<br>२) फिर्यादी हाच एकमेव प्रत्यक्ष साक्षीदार असल्याने, सरकारी पक्षास कोणतेही सहकार्य न केलेमुळे पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झालेला आहे. | नाही | **निरंक** | - |
| ३ | सेशन केस क्र. १४०६/२०१९<br>कोर्ट नं. ५८<br>मा. न्यायाधीश डॉ. श्री. यु.जे. मोरे | **मा.र.आं. मार्ग पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ७८/२०१५,<br>कलम ३५३, ३३८ भा.दं.वि. | ०४/०९/२०१९ | २०/०९/२०२१ | १) फिर्यादी याने फिर्यादीमध्ये नमूद केलेला जबाब आणि मा. न्यायालया समक्ष दिलेली साक्ष यामध्ये तफावत आहे.<br>२) मा. न्यायालयासमोर तपासण्यात आलेल्या तीनही साक्षीदारांच्या साक्षीमध्ये तफावात आहे.<br>३) सरकारी पक्षाने वैद्यकीय अधिकारी यांना तपासले नाही. तसेच फिर्यादी याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सुध्दा मा. न्यायालया समोर सादर केले नाही.<br>४) सदरची घटना व दाखल एफ.आय.आर. यामध्ये बराच कालावधी गेलेला दिसून आलेला आहे.<br>५) घटनास्थळ पंचनामा नाही, फिर्यादी घटने दिवशी कर्तव्यावर हजर होता याबाबत पुरावा नाही, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही.<br>६) फिर्यादीनेच सरकारी पक्षास सहकार्य न केल्याने, तसेच सबळ पुरावा मिळून न आल्याने, आरोपी दोषमुक्त झालेला आहे. | नाही | **निरंक** | - |

Scanned with CamScanner

प्रकर

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | पोक्सो सेशन केस क्र. ३६०/२०१७<br>कोर्ट नं. ३५<br>मा. न्यायाधीश श्रीमती ए.डी. देव | मा.द.आं. मार्ग पोलीस ठाणे<br>गु.र.क्र. ११६/२०१७, कलम ३६३, ३७६, भा.दं.वि. सह ६ पोक्सो | ०३/०८/२०१७ | २९/११/२०२१ | १) मा. न्यायालया समक्ष सरकारी पक्ष बळीत मुलगी ही अल्पवयीन असलेबाब मौखिक अथवा कागदोपत्री पुरावा सादर करून शकले नाहीत.<br>२) बळीत मुलगी फितूर झाली असून, सदरची तक्रार तीच्या मानीने गैरसमजूतीने दिले असलेबाबत मा. न्यायालयासमोर सांगितले. ३) बळीत मुलीस घटनेबाबत विचारणा केली असता ती लक्षात नसल्याचे सांगितले आहे.<br>४) बळीत मुलीने आरोपीशी लग्न केले असून, त्यांना आपत्य देखील आहे. उपरोक्त कारणानी आरोपी दोषमुक्त झालेला आहे. | नाही | निरंक |

Scanned with CamScanner